## प्रकरण दुसरे

## वाई परिसराची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

## प्रकरण दुसरे

## वाई शहर व परिसराची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

वाई हे शहर सातारा जिल्हातील तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. वाई शहराकडे जाण्यासाठी तीन-चार महत्वाचे मार्ग आहेत. वाईच्या उत्तरेकडून वाईस येण्यासाठी पुणे-वाई-महाबळेश्वर असा रस्ता असून, पूर्वेकडून वाईस येणारांसाठी दक्षिण मध्ये रेल्वेच्या वाठार स्टेशनपासून येणारा रस्ता वाईस येताना पुणे-महाबळेश्वर रस्त्यास मिळतो. वाईच्या दक्षिणेकडून सातारा-वाई रस्ता आहे. पश्चिमेकडून वाईला येण्यासाठी महाबळेश्वर-वाई रस्ता आहे. पुणे ते वाई अंतर ८८ कि.मी. आहे. वाठार-वाई, सातारा-वाई व महाबळेश्वर-वाई ही अंतरे सामान्यत: ३२ ते ३५ कि.मी. च्या आसपास आहेत. वाई शहर शेजारच्या तालुक्यांच्या व जिल्हाच्या मुख्य ठिकाणाला जोडले गेले आहे. (कृपया नकाशा क्र. १ पहा.)

कवि मोरोपंतांची वाई वरील आर्या प्रसिध्द आहे. ती अशी -

कृष्णातिरी मूर्त<br>
क्षेत्र सुगुण आज काल वाईत<br>
ईच्या यशे धरिलचि<br>
अमृताचा लाज कालवा ईत [१]

कवि मोरोपंतांनी या आर्येच्या माध्यमातून वाईचा महिमा किती थोर आहे हे सांगितले आहे. वाईत कृष्णा तीरावर आजकाल मूर्तिमंत सुगुण क्षेत्र आहे. वाईच्या किर्तीमुळे येथे अमृताचा प्रवाहही (कालवा) लाजेल. महाराष्ट्राच्या सातारा जिल्हातील एक प्राचीन क्षेत्र म्हणूनही वाईचा उल्लेख केला जातो.

### वाई शहर व परिसराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

वाई शहरास मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याचे आपणास दिसून येते. वाई ही नगरी सुमारे २००० वर्षांची तरी असावी असा क्यास करण्यास

हरकत नाही. पुणे येथील पुरातत्व संशोधक डॉ. ह.धि. सांकलिया यांनी असे दाखवून दिले आहे की, इ.स. ८ व्या शतकात वाई हा गाव होता व त्यास `वायी` असे म्हणत. दोन हजार वर्षांपूर्वी वाई हे गाव वसले असावे. वाईच्या दक्षिणोत्तर दिशांना उंच-उंच डोंगरांच्या रांगा लागलेल्या आहेत. या दोन्ही बाजूंच्या डोंगरामध्ये हीनयान बौध्द पंथांच्या कोरलेल्या छोटया-छोटया गुहा आहेत. काही डोंगरांच्या शिखरावर दहा ते पन्नास हजार चौरस फूट चतु:ष्कोण आकार असलेले आणि ४० ते ६० फूट उंचीचे पाषाणाचे प्रस्तर आहेत. ते प्रस्तर ब-याच ठिकाणी ५ ते १५ फूट जाडीच्या मातीच्या थरांनी झाकलेले आहेत.[२] यावरून असे लक्षात येते की, प्राचीन हिंदू राजवटीत या डोंगरांना लढाऊ गडाचे स्वरूप दिले असावे. त्यातील एकाला रोहितगड, दुस-याला कमळगड, तिस-याला पांडवगड व चौथ्याला वैराटगड असे म्हणतात. हे सर्व डोंगरी किल्ले शिलाहार-कालीन आहेत. पांडवगड व वैराटगड हे वाईपासून सुमारे तीन ते चार मैलावर आहेत. पूर्वेच्या बाजूला असलेल्या १०-१२ मैलावरील डोंगरांच्या रांगेमध्ये चंदन-वंदन नावाने दोन किल्ले आहेत. वाईपासून सुमारे ५ मैलावर असलेल्या सुलतानपूर या खेडेगावात एका इंग्रजी संशोधकाला सातवाहनांची नाणी सापडली होती. यावरूनही वाईची पुरातनता अनुमानिता येते.[३]

वाई शहराचे दोन भाग पडतात. १) पेशवाईपूर्वीची पूर्वेकडील वाई किंवा जुनी वाई. या ठिकाणी अजूनही आपणास `गाव चावडीचे कार्यालय` पहावयास मिळते. या जुन्या वाईला जोडून असलेली २) पश्चिमेकडील वाई किंवा सरदार रास्त्यांनी नव्याने वसविलेली वाई. जुन्या वाईला व मोवतालच्या प्रदेशाला छत्रपती शिवाजी महाराजांचे पाय लागले होते असा उल्लेख इतिहासात नमूद आहे.

`वाई` हे नाव कसे पडले ?

वाई शहराला `वाई` हे नाव नेमके कशामुळे पडले असावे हे सांगणे अतिशय कठीण आहे. तरीदेखील पुढील विविध संदर्भांच्या आधारे वाई हे नाव

कसे रूढ झाले असावे याबाबतचा साधार तर्क आपणास काढता येतो. महाराष्ट्रात वाई नावांची ३१ गावे आहेत.

वाई या शब्दा जवळचाच दुसरा शब्द ` वावी ` असा आहे. गुजरातेत वापिका > वापी असे गाव आहे. त्यांच्या पुढील रूप ` वावी ` हे होय. वावी नावांची कित्येक गावे महाराष्ट्रात आहेत. वावी पासून वाई असे रूप बनणे शक्य आहे.[४]

वाई हे नाव ` वाय ` (विणकर) या संस्कृत नावावरून पडले असावे. प्राचीन संस्कृतीमध्ये कापडाच्या उद्योगाला फार महत्व होते. वाई आणि वाईच्या परिसरात कापड निर्मितीचा ग्रामीण उद्योग हजारो वर्षे चालू होता. म्हणूनच धोमपासून ते कोरेगावपर्यन्तच्या भागाला ` वायदेश ` म्हणत असत. वाय म्हणजे कोष्टी. वायदेश म्हणजे कोष्ट्यांचा देश.[५] वाई आणि वाईच्या परिसरात असणा-या खेडेगावांमध्ये अजूनही विणकरांची घराणी आढळतात.

तामिळ, कन्नड, तेलगु आणि मल्याळम् या चार द्राविडी भाषा व त्यांच्या बोली यामध्ये वाय, बाय (इ.) वायि, वा आणि बायि असा एक शब्द आहे. त्याचा अर्थ मुख असा आहे. या शब्दावरून सध्याचे वाई हे नाव पडले असेल काय ?[६] ही व्युत्पत्ती ग्राह्य धरली तर वाई हे कशाचे तरी मुख असले पाहिजे. येथे हे मुख कशाचे ? तर कृष्णा नदीच्या खो-याचे. हा अर्थ किंवा व्युत्पत्ती अगदीच चुकेल असे नाही.

मुसलमानपूर्व काळात लहान-लहान भूप्रदेशांना विषय, भुक्ति, देश इत्यादी संज्ञा होत्या. पुणे ज्या प्रदेशात होते त्यास पुण्य किंवा पुनक विषय म्हणत. मिरज ज्या प्रदेशात समाविष्ट होती त्याला मिरिंजे देश असे नाव होते। त्याप्रमाणे महाबळेश्वराच्या पायथ्यापासून ते कोरेगावपर्यन्तच्या प्रदेशाला वाय देश म्हणण्याचा प्रघात होता.[७] तथापि पूनक किंवा पुण्य, मिरिंजे या देशांचे मुसलमानपूर्व कालीन निर्देश मिळाले. तसा वायदेशाचे मुसलमानपूर्व कालीन

किंवा मुसलमानकालीनही निर्देश अद्यापपर्यन्त मिळालेले नाहीत. तेव्हा वाय देश हा शब्द लोकोक्तीमध्येच होता असे वाटते. परंतु याला एक अपवाद आहे तो असा. महानुभावांच्या लीळाचरित्र ग्रंथाची जी चार-पांच संस्करणे झाली त्यापैकी एका संस्करणाला ` वाईदेशाकरपाठ ` म्हणतात. हे संस्करण १५ व्या शतकात तयार झाले अशी कल्पना आहे. या ठिकाणी आलेल्या ` वाई ` या शब्दाने वाई ओळखली जात असेल तर येथे मात्र थोड्या फरकाने वायदेशाचा निर्देश आला आहे असे म्हटले पाहिजे.

वरील विवेचनाचे तात्पर्य असे की, वाई या गावाचा मुसलमानपूर्वकालीन एखादा स्पष्ट उल्लेख जोपर्यन्त मिळत नाही तोपर्यन्त या नावाची व्युत्पत्ती वादग्रस्त आहे असे समजले पाहिजे.

वाई शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी आपणास पुढील विविध टप्प्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

अ) <u>प्राचीन काळ</u> :

बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठातील श्री. एस.सी.मलिक यांनी सातारा जिल्हातील माहुलीपासून महाबळेश्वरपर्यन्तचा कृष्णाकाठ व त्यालगतचा प्रदेशात बृहत् अश्मयुगीन किंवा लघु अश्मयुगीन हत्यारे मिळतात की काय हे पाहाण्याचा प्रयत्न केला होता. या प्रयत्नामध्ये त्यांनी वाईचा कृष्णाकाठ व किवराकाठ तपासून पाहिला. त्यांना हा काठ लघु अश्मयुगीन असल्याचे आढळले. तेथील जमिनीवर व शेतांमध्ये विविध प्रकारची लघु अश्मयुगे सातवाहनकालीन असावीत असा त्यांचा तर्क आहे.[८] काही वर्षांपूर्वी वाईच्या ईशान्येस असलेल्या सुलतानपूर या खेड्याजवळील टेकडीच्या पायथ्याशी काही सातवाहनकालीन नाणी सापडल्याचे बॉम्बे ब्रँच रॉयल एशियाटिक सोसायटीच्या नियतकालिकाच्या एका अंकात नमूद केले आहे. मधून मधून वाईला किंवा वाईच्या आसपास सातवाहनकालीन नाणी सापडतात असे वाई येथील रहिवासी श्री. विश्वास शेंडे यांना

मिळालेल्या नाण्यावरून म्हणता येते.[९] वाईच्या उत्तरेस व दक्षिणेस असलेल्या डोंगरात हीनयान बौध्द पंथीयांच्या गुहा आहेत. यावरून पूर्वी बौध्दांचे ठाणे या बाजूस असावे असा तर्क करता येतो.[१०] स्कंद पुराणांतर्गत म्हणविल्या जाणाऱ्या कृष्णामाहात्म्यात वाईचा वैराजक्षेत्र असा उल्लेख आढळतो. याशिवाय विराटनगर या नावानेही हे गाव परिचित आहे. पांडवांनी आपल्या अज्ञातवासाचा काही काळ इथे काढला अशी समजूत आहे.[११] या समजुतीच्या स्मृती अजूनही येथे आढळतात. वाईच्या पूर्वेला एक ओढा असून त्याला ` किचक किंवरा ` असे नाव आहे. भीमाने किचकाचा वध केल्यानंतर त्याच्या रक्ताचा पाट ओढयाच्या रूपाने इथे वाहू लागला असे म्हणतात. अशा इतरही समजुती लोकांमध्ये आजही प्रचलित आहेत.

वरील विविध संदर्भांच्या आधारे वाई व आसपासची वस्ती इसवी सनाच्या अगोदर दोन-तीन शतके तरी असलीच पाहिजे या विषयी शंका रहात नाही.

ब) <u>मध्ययुगीन काळ</u> :

ग्रँट डफने मराठ्यांच्या इतिहासात लिहिले आहे की, इ.स. १३९६ ते १४०८ या १२ वर्षांच्या काळात महाराष्ट्रात मोठाच दुर्गादेवीचा दुष्काळ होता. साहजिकच दुष्काळामुळे महाराष्ट्रातील वस्ती उठून जाऊन महाराष्ट्र ओस पडला होता. हा उजाड झालेला महाराष्ट्र पुन्हा वसविण्यासाठी त्यावेळचा बहामनी सुलतान अहमदशाह वली याने प्रयत्न केला. त्याने त्याचा एक सरदार मलिकुत्तुज्जार उर्फ हसन बसरी यास महाराष्ट्रात पाठविले.[१२] त्याचा हा सरदार खटाव व माणदेशातील शंभु महादेवाच्या डोंगरातील चोर व डाकूंचा बंदोबस्त करून वाईला आला. इ.स. १४५३ पासून ते १४८० पर्यन्त बहामनी घराण्याचे लष्करी ठाणे वाईस होते.[१३]

फार्सी ग्रंथामध्ये इ.स. १५०० व पूर्वीचे वाईसंबंधी फक्त दोन उल्लेख आढळतात. बहामनी सुलतान दुसरा मुहम्मदशाह याच्या कारकिर्दीत त्याचा मुख्य प्रधान महमूद गावान याने हिजरी ८७४ (इ.स. १४९९) साली खेळण्याचा राजा शंकरराय व इतर विरोधी राजे यांच्यावर स्वारी केली. त्यावेळी त्याने बरोबर घेतलेल्या सैन्यात जुन्नर, चाकण, क-हाड, दाभोळ, वाई, माण आणि इतर प्रदेशातील शिपाई होते असा उल्लेख आहे. याच्याच कारकिर्दित बहामनी राज्याचा विस्तार झाल्याने त्याचे विभाजन झाले. पहिला बहामनी सुलतान अल्लाउद्दीन हसन गंगू याच्या काळात राज्याचे चार विभाग होते. परंतु त्याने आता राज्याचे आठ विभाग केले. ` त्या आठ विभागांपैकी एका विभागात जुन्नर व त्याच्या दक्षिणेस असलेले इंदापूर, वाई, माण हे प्रदेश आणि गोवा व बेळगाव येथील किल्ल्यांचा समावेश केला.`

बहामनी राज्याचे पाच तुकडे झाल्यानंतर बरीच वर्षे वाईच्या मोवतालचा प्रदेश अहमदनगरच्या निजामशाही राज्यात होता. परंतु इ.स.१५६५ मध्ये झालेल्या राक्षसतागडीच्या लढाईनंतर निजामशाही राज्य -हास पाऊ लागले. तेव्हा वाई देश कधी निजामशाही राज्यात तर कधी आदिलशाही राज्यात मोडू लागला. इ.स. १६३६ मध्ये निजामशाही राज्य लयास गेल्यानंतर वाईचा प्रदेश कायमचा आदिलशाही प्रदेशात समाविष्ठ झाला.[१४] इ.स. १६४८ मध्ये विजापूरचे कामदार वाईस रहात असल्याबद्दलचा संदर्भ आढळतो.[१५]

थोडक्यात वरील संदर्भानुसार मध्ययुगीन कालातही वाई व वाई परिसराचे विविध उल्लेख आढळतात. बहामनी काळातील व नंतर अहमदनगरच्या निजामशाही राज्याचा -हास झाल्यानंतर वाई आदिलशाही प्रदेशात समाविष्ठ झाली. इथपर्यन्त वाईचे उल्लेख स्पष्टपणे आढळताना दिसतात.

क) <u>शिवकाल</u> :

आपण शिवकालात येतो तसतसे वाई गावाचे अधिकाधिक उल्लेख मिळू लागतात. त्यादृष्टीने शिवचरित्र साहित्य खंड ६ मध्ये प्रसिध्द झालेली स्मरणार्थ टिपणे (यादीनामे) विचारणीय आहेत. ही टिपणे वाईस मिळालेली आहेत असे वाटते. प्रसिध्द केलेली टिपणे ४८ आहेत. २९ व्या टिपणात विठ्ठल जगदेवराव ब्राह्मण इ.स. १५९३ च्या सुमारास बाटल्यावर त्याचे नाव हैबतखान ठेवले होते. हा वाईचा असावा अशी कल्पना आहे.

स्मरणार्थ टिपणात (यादीनाम्यात) जी माहिती आली आहे, त्यावरून असे दिसते की, अफझलखान प्रसंगानंतर वाई शिवछत्रपतींच्या ताब्यात तात्पुरतीच गेली होती. ती पुन्हा विजापूरकरांच्या ताब्यात गेली. इ.स. १६७४ च्या सुमारापर्यन्त वाईचा ताबा सारखा बदलत होता.[१६] शेवटी इ.स.१६७५ मध्ये शिवछत्रपतींनी वाईच्या कोटास वेढा घातला व तो हस्तगत केला. कोट व वाई छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात आल्यानंतर महाराजांनी 'येसाजी मल्हार' याची वाईचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. यावेळी वाई शिवछत्रपतींच्या ताब्यात गेली. ती संभाजी महाराजांचा वध होईतोपर्यन्त मराठ्यांकडेच होती. वाई परगण्यातील अफझलखानाची कारकिर्द इ.स. १६४९ ते १६५९ अशी होती.[१७] प्रतापगड संग्रामाच्यावेळी अफझलखान व त्याच्या सैन्याचा तळ वाई परिसरात होता. इ.स. १६९० मध्ये छ.राजाराम महाराजांचे कारकिर्दीत मोंगलांनी वाईवर पुन्हा चढाई केली. परंतु संताजी घोरपडे यांनी तो हल्ला परतविला व वाई मराठ्यांचे ताब्यात ठेवली.

इ.स. १७०८ साली शाहू राजे दिल्लीहून सुटून आल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीतील वाईचा उल्लेख आढळतो. त्यावेळी राजांना राज्यारूढ करण्याच्या कामी वाई येथील शेखमिरे यांनी मदत केल्याने त्यांना शाहू महाराजांनी पसरणी हा गाव इनाम म्हणून दिला.

शिवकालात वाईचे खूप उल्लेख आढळतात. याचे कारण असे की, प्रतापगडचा मोठा संग्राम वाईपासून सुमारे ५५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या प्रतापगड या ऐतिहासिक किल्ल्यावर घडला होता. या संग्रामाअगादेर अफजल खान उत्तरेकडून दक्षिणेकडे येत असताना वाईला त्याचा तळ पडला होता. येथूनच तो प्रतापगडच्या संग्रामाच्या भावी योजना आखीत होता. तसेच छ. राजाराम व छ. शाहू राजे यांच्या कारकिर्दीतील उल्लेख आढळतात.

ड) पेशवे काळ :-

इ.स. १७११ सालच्या उपलब्ध झालेल्या एका कागदानुसार २३ एप्रिल रोजी वाईच्या कोटात अनाजी जनार्दन हा मुद्दाम नेमलेला फौजदार व अनाजी बल्लाळ हा कारकून होता.[१८] यावरून वाईचा ताबा काही काळ प्रतिनिधींकडे होता असा तर्क करता येतो. इ.स. १७१३ साली उपलब्ध झालेल्या दुसऱ्या एका कागदावरून असे दिसते की वाईचा कारभार इ.स. १७१० ते १७१३ या काळात क्रमाने परसोजी भोसले, प्रतिनिधी आणि माहादाजी गदाधर सुमंत याजकडे गेला होता. मुघल बादशाहाने स्वराज्य आपणास बहाल केल्याने यापुढे मुघलास द्यावयाचा वसूल त्याना न देता मजकडे देत जावा असे राजपत्र छ. शाहू महाराजांनी वाई परगण्यातील लोकांना पाठविल्याचा उल्लेख इ.स. १७१८ साली उपलब्ध झालेल्या अन्य एका कागदामध्ये आढळून येतो.[१९]

पेशवे दप्तरात इ.स. १७६९-७० चा म्हणजे थोरल्या माधवराव पेशव्यांच्या राज्य काळातील एक कागद उपलब्ध झाला आहे. इ.स. १७७९ ची व सवाई माधवराव पेशव्यांनी वाईतील ब्राह्मणांना दिलेली एक सनद उपलब्ध आहे. या सनदेमध्ये वाईच्या कोटासंबंधी माहिती दिलेली आहे. सवाई माधवराव पेशवे आश्विन शुध्द १३ (१९ आक्टोबर १७९१) रोजी वाईस आले होते असा उल्लेखही आढळतो.[२०] तेव्हापासून म्हणजे इ.स. १७९१ पासून वाई सरदार

रास्त्यांच्या जहागिरीत आली.[२१] सरदार आनंदराव रास्ते यांनी पुरंदर येथे जाऊन सवाई माधवराव पेशव्यांना विनंती केली की, त्यांनी वाई येथे बांधलेल्या श्री विष्णू मंदिरातील देवतेची दैनंदिन पूजा नित्यनियमाने व्हावी म्हणून व वाईतील ब्राह्मणांचा चरितार्थ नीट चालावा यासाठी पेशव्यांनी त्यांना वाईजवळचे कैंजळ गाव व त्या गावाजवळचा धामणा डोंगर इनाम करून दिला. तेव्हापासून पुढे वाई सरदार रास्त्यांच्या जहागिरीत आली. यावरून असे ध्यानात येते की पेशवाई कालखंडातही वाई गावाबद्दलचे अनेक उल्लेख सापडतात.

इ) <u>अर्वाचीन काळ</u> :

या काळात वाई गावाबद्दलचे विशेष उल्लेख आढळत नाहीत. परंतु पुण्याच्या पेशवे दप्तरातील, सातारा येथील नोंदणी दप्तरात इ.स. १८५४ साली नोंदलेला एक कागद उपलब्ध झाला आहे. त्या कागदात इ.स. १८२३ मध्ये वाईच्या गावठाणाची मोजणी केल्याचे व एकूण क्षेत्र किती भरले हे सांगितले आहे.[२२] या मोजणीमध्ये वाई गावठाणाचे दोन विभाग केले आहेत. त्यातील एकाला 'वरील थडी' व दुसऱ्याला 'खालील थडी' (थडी म्हणजे विभाग) असे म्हटले आहे. पण दुर्दैवाने या कागदात फक्त वरील थडीच्या गावठाणाच्या मोजणीचा हिशोब दिला आहे. खालच्या थडीचा कागद अजून उपलब्ध झालेला नाही.

फ) <u>आधुनिक काळ</u> :

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई लयास गेली. ब्रिटिशांचे राज्य सुरू झाले. त्यामुळे वाईच्या जीवनात इतर ठिकाणांप्रमाणे बदल होणे अपरिहार्य होते. या काळातील वाईसंबंधीचे अनेक उल्लेख आढळतात. प्रामुख्याने दैनिक केसरीच्या (मायक्रोफिल्म रूपात) अनेक अंकातून वाईत घडलेल्या विविध घटनांबद्दल माहिती आल्याचे आढळून येते. त्यानुसार मार्च १८५१ मध्ये वाईस

महामारीचा उपक्रम झाला होता. १८५३ च्या जुलै महिन्यात कृष्णा नदीला मोठा पूर येऊन अनेक घरे वाहून गेल्याची नोंद मिळते. नोव्हेंबर १९१३ च्या केसरीत वाईतील प्लेगच्या साथीबद्दल माहिती आहे. १९१५ च्या जूनमधील अंकात वाईच्या गोशाळेविषयी खूपच विस्तृत माहिती आलेली आहे.[२३]

वाई व परिसराची भौगोलिक स्थिती :

आपल्या अभ्यासाचे क्षेत्र म्हणजे वाई व वाईचा परिसर हे महाराष्ट्रात दख्खन पठारावर येते. वाई हा तालुका सातारा जिल्ह्याच्या उत्तर भागात असून जावली, महाबळेश्वर, सातारा व खंडाळा हे तालुके वाई तालुक्याच्या शेजारी आहेत. वाई तालुक्याचे क्षेत्रफळ ५९४.३ चौरस कि.मी. असून त्यातील खेड्यांची संख्या १०० आहे. वाई तालुक्याची लोकसंख्या १९८१ च्या जनगणनेनुसार १,४३,२१७ एवढी आहे.[२४] वाई शहराची समुद्रसपाटीपासूनची उंची ७०१ मीटर एवढी असून वाई शहर १७°.५७' उत्तर अक्षांश व ७३°.५४' पूर्व रेखांशामध्ये वसलेले आहे.

वाई तालुक्याचा पश्चिम भाग डोंगराळ आहे. या भागात अनेक छोटी छोटी खोरी आहेत. वाईच्या पश्चिमेस १६ कि.मी. अंतरावर कमळगड असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची ४५११ फूट आहे. वाईच्या ईशान्येस सुमारे ७ कि.मी. अंतरावर पांडवगड असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ४१७७ फूट आहे. आजूबाजूच्या या डोंगरामुळे वाई तालुक्याचा आकार काहीसा बशीसारखा झाला आहे. सह्याद्रीच्या मूळ रांगेपासून लहान लहान फाटे पूर्व बाजूस पसरले आहेत. त्यामुळे अनेक छोट्या मोठ्या दऱ्या निर्माण झाल्या आहेत. वरील गडांना लागूनच उत्तरेला सह्याद्रीची जी अत्युच्च शिखरे आहेत त्यात मांढरदेवचे पठार महत्त्वाचे गणले जाते.[२५] वाई तालुक्याच्या उत्तर सीमेवरून पांडवगड (उंची ४१७७ फूट), मांढरदेव (उंची १२५१.८० मीटर) या डोंगर रांगा पूर्वेकडे उतरत गेल्या आहेत. तर दक्षिण सीमेवरून पाचगणी-पसरणी

घाटाची डोंगर रांग वैराटगडापर्यन्त (ऊंची ११९८.६८ मीटर) व पुढे आसले, पाचवड अशी उतरत गेली आहे. वाई तालुक्याच्या पूर्व सीमेवर परखंदी गावाजवळ छोटी डोंगररांग उत्तरेकडून दक्षिणेस पसरली असून त्यावर चवणेश्वर (ऊंची ११४०.७४ मीटर) माथा येतो.

या पश्चिम भागातील परिसरात भूप्रदेश, विषम भूपृष्ठ रचनेचा आहे. धोमनंतर वाई व पुढे पूर्वेस कृष्णा खोरे रुंद होत जाते. नदीकाठची गाळाची जमीन सुपीक व कसदार असून त्यावरची जमीन कमी सुपीक आहे. जमीन ' रेगूर ' प्रकारची, लाव्हा रसापासून बनलेली आहे. यामध्ये वाई तालुक्याच्या पूर्वभागाचा समावेश होतो.[२६] एका बाजूला दक्षिणेस पाचगणी-पसरणी घाट व दुसऱ्या बाजूला पांडवगड-मांढरदेव डोंगर रांगा यामधील वाईचे कृष्णा खोरे हे उठून दिसते. त्यात पश्चिम भाग जास्त पावसाचा व पूर्वभाग कमी पावसाचा असे दोन भाग आढळतात.

<u>हवामान व पाऊस</u> :

वाई तालुक्याचा पूर्वभाग हा पर्जन्य छायेच्या प्रदेशात येतो. पावसाळ्यात येथील हवामान दमट व कोंदट असते. त्यामुळे रोगांचा प्रादुर्भाव पावसाळ्यात जास्त होतो.[२७] वाईच्या पूर्व भागातील सरासरी पर्जन्यमान ५०० मि.मी. आहे. वाई शहराचे व तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान ७९० मि.मी. आहे. सह्याद्री पर्वत रांगेच्या व जंगलव्याप्त प्रदेशात स्थानपरत्वे ८८० मि.मी. ते ४४०० मि.मी. पाऊस पडतो. वाई शहर व तालुक्यातील पर्जन्यमानाचे वैशिष्टय असे की पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वेगाने कमी-कमी होत गेल्याचे दिसते.[२८] कारण महाबळेश्वर येथे पावसाचे वार्षिक सरासरी प्रमाण ४६०० मि.मी. तर पश्चिम भागात जोर या गावी २७५ इंच पावसाचे प्रमाण नंतर पूर्वेकडे आपण धोमला येतो तेथे ६० इंच तर वाई शहर ३५ इंच व वाई शहराच्या पूर्वेकडे आणखी गेल्यास जोडार्डे, अनेवाडी व शिरगांव या भागामध्ये पावसाचे प्रमाण आणखी कमी म्हणजे १० इंचापेक्षाही कमी पाऊस पडतो. त्यामुळे हा भाग दुष्काळी भाग म्हणूनच ओळखला जातो.

मोठी औद्योगिक वसाहत किंवा मोठा कोणताही अवजड प्रकल्प वाईत अथवा वाई परिसरात नसल्यामुळे वाईची हवा पावसाळ्या व्यतिरिक्त चांगली असते. वाई शहराचे कमाल तापमान ३३°.३ सेल्सीअस व किमान तापमान २०°.०० सेल्सीअस एवढे आहे.[२९] वाईला वैशिष्टयपूर्ण असे मान्सूनचे हवामान दिसून येते. हंगामाप्रमाणे हवामानाचे आपणास पुढीलप्रमाणे भाग पाडता येतात. ते असे -

| | | |
|---|---|---|
| १) हिवाळी हंगाम | - | डिसेंबर ते फेब्रुवारी |
| २) उन्हाळी हंगाम | - | मार्च ते मे अखेर |
| ३) पावसाळी हंगाम | - | जून ते सप्टेंबर |
| ४) मान्सूनचे पुनरागमन | - | आक्टोबर आणि नोव्हेंबर |

यावरून आपणास असे म्हणता येईल की, वाई तालुक्याच्या पश्चिम भागात पूर्वभागापेक्षा जास्त पाऊस पडतो. त्यामुळे पश्चिम भाग आर्द्र भाग म्हणून ओळखला जातो. तर पूर्वभाग हा कोरडा भाग म्हणून ओळखला जातो. पर्जन्यमानाचे वाई तालुक्यातील प्रमाण पाहता असे आढळून येते की, पर्जन्यमानाच्या कमी होण्याच्या प्रमाणानुसार पिकांच्या क्षेत्रात व लागवडीत बदल होत जातो. अलिकडे जलसिंचनाच्या सोईमुळे बागायती क्षेत्रात वाढ झाली आहे. विशेषत: ऊसाच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली आहे.

<u>कृष्णा नदी</u> :

कृष्णा नदीमुळे व तिच्या प्रवाहामुळे वाईच्या लौकिकामध्ये भर पडली आहे हे नाकारून चालणार नाही. कृष्णा नदी वाई शहराच्या दक्षिणेस पश्चिम पूर्व अशी वाहते. कृष्णा नदीच्या प्रवाहामुळे शहराचे दोन भाग झालेले आहेत. कृष्णा नदीच्या दक्षिणेस जुनी व सरदार रास्त्यांनी वसविलेली वाई व उत्तरेस नवीन वसलेली वाई असे दोन भाग पहावयास मिळतात. वाई शहराच्या पाणी पुरवठयाचा मुख्य स्त्रोत कृष्णा नदीच आहे. (कृपया नकाशा क्र. २ व ३ पहा)

वाई शहराला दौत्रत्व आणण्याचे श्रेय कृष्णा नदीला दिले जाते. या नदीला `कृष्णा` हे नाव पडण्याचे कारण स्कंद पुराणात सापडते. स्कंद पुराणातील तो श्लोक असा -

कृष्णाच दृष्टा कृष्णेन भुवं नीतच या दिव: ।
सर्वं कर्णतिचा धौघ तेनकृष्णा प्रकीर्तिता ।।

अर्थ : भगवान श्रीकृष्णांनी कृष्णा (नदी) पाहिली आणि तिला स्वर्गातून पृथ्वीवर आणली. पापाचा सर्व ओघ कृष्णा ओढून नेते म्हणून कृष्णा म्हटली जाते.[३०]

या कृष्णा माईचा महिमा फार मोठा आहे. प्रत्यक्ष श्री विष्णूंनी `कृष्णायाश्चापि सानिध्यात पापं नैव भविष्यति` असे वर्णन केले आहे. (अर्थ : कृष्णेच्या सानिध्यामुळे पाप घडतच नाही.)

कृष्णा नदीचा महाभारतात व पुराणामध्ये `कृष्णवेणा` असा निर्देश येतो. इतिहास संशोधक राजवाड्यांच्या पध्दतीने अनुमान केल्यास असे म्हणता येते की, प्राचीन पुराणामध्ये उल्लेखित वेन राजाच्या वंशातील `वेन` जमातीची वसाहत कृष्णा नदीच्या परिसरात प्रथम झाली असावी. ते कृष्ण म्हणजे कृषिकर्म करणारे लोक असावेत. कृष्ण शब्द `कृष` या शेती करणे या अर्थाच्या धातूवरून निष्पन्न होतो.[३१] यावरून या नदीला कृष्णा हे नाव पडले असावे असा तर्क करता येतो. पुराणात उल्लेखिलेली कृष्णवेण्णा किंवा योगिनीतंत्रात सांगितलेली कृष्णावेणी या नद्या किंवा अर्वाचीन कृष्णा नदी या एकच होत. जातक ग्रंथात ही नदी `कण्हपेण्णा` या नावाने ज्ञात असून खारवेलच्या हाथी गुंफेत `कण्हपेम्णा` असा कृष्णेचा निर्देश केलेला आहे.[३२] वाल्मिकी रामायणात या `कृष्णवेणी` (कृष्णा नदी) या दक्षिण भारतीय नदी काठी सुग्रीवप्रेषित अंगद सीता शोधार्थ आला होता असाही कृष्णेबाबत उल्लेख आढळतो.[३३] थोडक्यात कृष्णा नदी खूप प्राचीन व पवित्र

नदी आहे हे मान्य करावे लागते.

अशा या कृष्णा नदीचा उगम वाईपासून नदीच्या पात्रातून मोजला असता १५ मैलांपेक्षा दूर नाही. महाराष्ट्रात दख्खनच्या पठारावर कृष्णा नदीच्या खो-याचा उगमाकडील भाग येतो. येथील सक्क बेसाल्टचा आहे. खोल, अरुंद द-या, उंच शिखरे, तीव्र कडे यांनी हा भाग व्यापलेला आहे.[३४] कृष्णा नदीचा उगम क्षेत्र महाबळेश्वर येथे आहे. क्षेत्र महाबळेश्वरची समुद्रसपाटीपासूनची उंची ४५०० फूट एवढी आहे. महाबळेश्वर हे अरबी समुद्रापासून ६४ कि.मी. सह्याद्रीच्या माथ्यावर येते. उगमापासून वाईपर्यंतचे कृष्णा नदीचे अंतर २९ कि. मी. आहे. वाईची समुद्रसपाटीपासूनची उंची ७०१ मीटर एवढी आहे.

दक्षिण भारतातील गोदावरी व कावेरी या नद्यांप्रमाणेच कृष्णा नदीही पवित्र मानली जाते. कृष्णा नदी पश्चिम-पूर्व अशी वहात जाऊन शेवटी बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते.

कृष्णा नदी क्षेत्र (जुने) महाबळेश्वर येथील ब्रह्मारण्यामध्ये ऊगम पाऊन उत्तरेस व नंतर पूर्वेकडे वहात जाते. धनगरवाडीपासून जोर खो-यामधून तीवाई तालुक्यात प्रवेश करते. कृष्णा नदीचा उगम समुद्रसपाटीपासून ४५०० फूट उंचीवर असून हा प्रदेश १८.°१' उत्तर अक्षांश व ७३.°४१' पूर्व रेखांशावर येतो. नदीच्या उगमाच्या ठिकाणी एक महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात असलेल्या ' गोमुखातून ' कृष्णेचा लहानसा प्रवाह समोरील कुंडात उडी घेतो. हाच कृष्णेचा पारंपारिक प्रवाह होय.[३५] याच प्रवाहाला हिंदू लोक श्रध्देने ' कृष्णाबाई ' असे म्हणतात. येथून कृष्णा जोर खो-यातून १५ मैलावर असलेल्या वाईला पोहोचते.

वाई तालुक्याच्या पश्चिम भागात कमळगड डोंगराच्या उत्तर भागातून ' वळकी ' ही उपनदी वडोली, आसरे, वेलंग या गावाजवळून पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात येते व धोम धरणाच्या क्षेत्रात कृष्णा नदीला येऊन मिळते. कृष्णा व वळकी यांची खोरी अशारितीने वाईच्या पश्चिम भागात कमळगड डोंगर रांगेने

विभागलेली आहेत. हे नकाशा क्र. ३ वरून दिसून येईल. धोम धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण १५० इंचापेक्षाही अधिक आढळते.

कृष्णा नदी वाई तालुक्यात वळकी या उपनदीसह पश्चिमबाजूने धोम, मोर्गाव, मेणवली व वाई अशी पूर्वेकडे वहात येते. कृष्णा नदीला उत्तरेकडून व दक्षिणेकडून अनेक लहान मोठे ओढे, नाले येऊन मिळतात. त्यात पांडवगडाच्या बाजूने येणारा किवरा ओढा, कवठे या गावाजवळून येणारा चंद्रगंगा ओढा व बावधन या गावाकडून येणारा बावधन ओढा. हे मुख्य ओढे आहेत. तसेच उजव्या बाजूने पांचवड गावाजवळ कृष्णेला कुडाळी उपनदी येऊन मिळते व पुढे कृष्णा वाई तालुक्यातून सातारा तालुक्यात प्रवेश करून दक्षिणेकडे वहात जाते.

कृष्णा नदीच्या उगमापासून ते वाईपर्यन्तचा भाग कृष्णेच्या पहिल्या टप्प्याचा भाग असल्याने तेथे पार्श्ववर्ती खननापेक्षा उभे खनन अधिक होते. त्यामुळे नदीच्या पात्राची रुंदी कमी पण ठिकठिकाणी खोली जास्त आढळते. पात्रात ठिकठिकाणी झीज झालेले खडक आढळतात.[३६] पावसाळा सोडल्यास इतरवेळी पात्र जवळजवळ कोरडे पडलेले आढळते. पात्रात अधूनमधून ' कुंभगर्ता ' Pot hole निर्माण झालेल्या आढळतात. कुंभगर्तेच्या खोलगट भागात पाणी साचते. वाई शहरातील रामडोह हे कुंभगर्तेचे उदाहरण देता येईल. कुंभगर्ता म्हणजे पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे खडकाची झीज होऊन त्या ठिकाणी खोल असा खड्डा निर्माण होणे याला कुंभगर्ता असे म्हणतात.

वरील विवेचनावरून वाई व परिसरामध्ये कृष्णा नदीचे स्थान व महत्व कसे अद्वितीय आहे हे लक्षात येते. कृष्णा नदीने केवळ वाईला क्षेत्रत्वच प्राप्त करून दिले आहे असे नसून वाई व परिसराला एक जीवनच प्राप्त करून दिले आहे. वाईच्या सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक बाबतीत कृष्णेचा प्रभाव मोठाच असल्याचे जाणवते.

**वाई शहराची लोकसंख्या :**

१९८१ च्या जनगणनेनुसार वाई शहराची लोकसंख्या २४,६६१ एवढी आहे. लोकसंख्या वाढीचा वेग इतर शहरांशी तुलना करता त्यामानाने कमी आहे. तक्ता क्र.२.१ वरून वाई शहराच्या लोकसंख्येत कसकसा बदल होत गेला त्याचे शेकडा प्रमाण किती होते हे लक्षात येते.

**तक्ता क्र.२.१**

**वाई शहराची लोकसंख्या**

| वर्ष | लोकसंख्या | वाढीचा दर |
|---|---|---|
| १९०१ | १३,९८९ | - |
| १९११ | ५,३३३ | - ६१.८८ |
| १९२१ | १०,२११ | + ९१.४७ |
| १९३१ | ११,७६० | + १५.१७ |
| १९४१ | १४,८९३ | + २६.६४ |
| १९५१ | १६,०९९ | + ८.१० |
| १९६१ | १७,८२६ | + १०.७३ |
| १९७१ | २१,०४० | + १८.०३ |
| १९८१ | २४,६६१ | + १७.२१ |

आधार : Census of India, 1981, Satara District, District Census Handbook, p. 159.

वाई शहराची लोकसंख्या जिल्ह्यातील इतर शहरांशी तुलना करता झपाट्याने वाढली नाही. याला कारणेही अनेक आहेत. त्यापैकी महत्वाची दोन-तीन कारणे म्हणजे, वाई शहर पुणे-बैंगलोर राष्ट्रीय महामार्ग

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

चारपासून १२ कि.मी. दूर तर दक्षिण-मध्य रेल्वेच्या वाठार रेल्वे स्टेशन पासून सुमारे ३५ कि.मी. दूर आहे. वाईला व वाई परिसरात अजूनपर्यन्त तरी एखाद्या महत्वाच्या खनिजाचा शोध लागलेला नाही. त्यामुळे वाई परिसरात उद्योगधंद्याची वाढ जवळ जवळ नाहीच असे म्हटले तरी चालेल. वाढत्या औद्योगिककरणामुळे शहराच्या लोकसंख्येत वाढ होत असते पण वाईला मोठे औद्योगिक प्रकल्प नसल्यामुळे लोकसंख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

तक्ता क्र.२.१ वरून १९०१ साली वाईची लोकसंख्या १३,९८९ होती. परंतु १९११ साली मात्र लोकसंख्या ५,३३३ एवढी, मोठया प्रमाणात कमी झाली आहे. कारण इ.स. १९०० मध्ये वाईला प्लेग व कॉलऱ्याची साथ सुरू झाली ती ८-१० वर्षे पुढे टिकून होती. या साथीत पाच हजार बहात्तर (५,०७२) लोकांचा मृत्यू झाला. असा संदर्भ मिळतो.[३७] नंतरच्याही कालखंडात ही साथ पुढे उद्भवत होती. परंतु मृत्यूचे प्रमाण मोठे नव्हते. या विविध कारणामुळे १९०१ व १९११ च्या जनगणनेतील लोकसंख्येत तफावत होती हे लक्षात येते.

वाई शहरातील लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरला ६,७९४ लोक इतकी आहे.[३८] वाई शहरात एकूण ४,९४१ घरे असून पैकी ४,८७९ घरे रहाण्यालायक आहेत.

एक बाब महत्वाची म्हणजे दर चौरस किलोमीटर मागे लोकसंख्येची घनता प्रचंड आहे असे म्हणता येणार नाही. लोकसंख्या वाढीमध्ये सतत चढ उतार होत असल्याचे दिसते.

वाईच्या लोकसंख्येत १९०१ ते १९८१ दरम्यान १४,००० पासून २४,६६१ पर्यन्त म्हणजे जवळजवळ दुपटीने वाढ झाली. लोक निर्वाचित सदस्यांच्या संख्येत मात्र तिपटीने वाढ झाली. यावरून नगरपारिषद अधिक प्रातिनिधिक होत असल्याचे उघड असले तरी या काळात नगरपरिषदेचा कारभार (विशेषत: नागरी सुविधांच्या संदर्भात) अधिक लोकाभिमुख झाला का हा खरा प्रश्न आहे.

## संदर्भ

१) वाई नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव स्मृतिग्रंथ, १९५६, पृ.१.
२) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, प्रस्तावना, अशी आमुची वाई, संपादक खरे ग.ह. व बोराटे व.म., अक्षर भांडार, पुणे १९७९, पृ.८.
३) खरे ग.ह. व बोराटे व.म., अशी आमुची वाई, अक्षर भांडार, पुणे, १९७९, पृ.८.
४) तत्रैव, पृ. २५.
५) पं. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, आठवा खंड (राजस्थान ते बिहार), भारतीय संस्कृति कोष,मंडळ, पुणे, १९७४, पृ. ५४०.
६) खरे ग.ह. व बोराटे व.म., तत्रैव, पृ. २६.
७) तत्रैव.
८) तत्रैव, पृ. २७.
९) तत्रैव, पृ. २८.
१०) केतकर श्रीधर व्यंकटेश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, खंड २० वा (व-हाड-सचिन), महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, नागपूर, १९२६, पृ.१२६.
११) पं. जोशी महादेवशास्त्री, तत्रैव, पृ. ५४१.
१२) खरे ग.ह. व बोराटे व.म., तत्रैव, पृ. २८.
१३) पं. जोशी महादेवशास्त्री, तत्रैव, पृ. ५४१.
१४) खरे ग.ह. व बोराटे व.म., तत्रैव, पृ. ३०
१५) केतकर श्रीधर व्यंकटेश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, खंड २० वा (व-हाड-सचिन), महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, नागपूर, १९२६, पृ. १२६.
१६) खरे ग.ह. व बोराटे व.म., तत्रैव, पृ. ३०.
१७) तत्रैव, पृ. ३२.
१८) तत्रैव, पृ. ३७.
१९) तत्रैव, पृ. ३९.
२०) तत्रैव, पृ. ४३.

२१) केतकर श्रीधर व्यंकटेश, तत्रैव, पृ. १२६.

२२) खरे ग.ह. व बोराटे व.म., तत्रैव, पृ. ५१-५२.

२३) तत्रैव, पृ . ५४-५५.

२४) Census of India, 1981, Satara District, District Census Handbook, pp. 3, 12 an d 45.

२५) भिडे रा.गो., __कृष्णाकाठचे वैभव__, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. ४.

२६) Sawant P.R., River Dam Constr uction and Resettlement of affected villages, Inter India Publication, New Delhi, 1985, p.12.

२७) Ibid, p. 17.

२८) Ibid, p. 12.

२९) Census of India, 1981, op.cit., p. 160.

३०) वाई नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव __स्मृतिग्रंथ__, १९५८-५९, पृ.१

३१) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, प्रस्तावना, खरे ग.ह. व बोराटे व.म., तत्रैव, पृ. ८.

३२) पं. जोशी महादेवशास्त्री, संपादक, __भारतीय संस्कृती कोश__, दुसरा खंड (कंक ते गावडा) भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, १९६४, पृ. ५००.

३३) चित्राव सिध्देश्वरशास्त्री, __प्राचीन भारतीय स्थलकोश__, खंड पहिला, भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे, १९६९, पृ. ५७५

३४) Sawant P.R., opcit, p. 9.

३५) Gazetter of India - Maharashtra State - Satara District Gazetter, Revised Edition of Volume XIX, p. 10.

३६) Sawant P.R., opcit, p. 12.

३७) वाई नगरपालिकेच्या दप्तरातील नोंदीतून.

३८) Census of India, 1981, opcit, p.3.